# सोलापूर महानगरपालिका , सोलापूर
# हुतात्मा स्मृती मंदिर (वातानुकूलित )
# नाट्यगृह भाड्याने देणे संबंधीच्या शर्ती व अटी

१) एकूण आसने ७८२. मात्र नाट्यगृहाची प्रत्यक्ष पाहणी करून बुकिंग करावे. वातानुकूलीत, सेन्सॉरच्या राखीव जागा ए-७ व ए-८, महानगरपालिकेची राखीव जागा एकही नाही. वीज पुरवठा खंडीत झाल्यास जनरेटरची सोय आहे. मात्र त्यावेळी वातानुकुलित व्यवस्था बंद राहील. यासाठी भाड्यामध्ये कसलीही सूट दिली जाणार नाही. जनरेटरसाठी प्रति तास रक्कम रूपये १०००/- चे डिजेल संयोजकाने भरणे आवश्यक आहे.

२) भाडेमध्ये कोणालाही सवलत नाही. ऑनलाईन भरण्यात आलेली अनामत रक्कम परत मिळणेसाठी कार्यालयात अर्ज व ज्यांचे नावे बुकिंग आहे त्यांचे बँक डिटेल देणे आवश्यक आहे. भाडे व्यतिरिक्त वापरानुसार वसुली रोखीने अथवा अनामत रक्कमेतून करणेत येईल.

३) नाट्यगृहात जितक्या व्यक्तीची बसण्याची सोय आहे तेवढ्याच व्यक्तींना प्रेक्षक म्हणून प्रवेश दिला जाईल नाट्यगृहात जादा खुर्च्या टाकता येणार नाहीत.

४) हुतात्मा स्मृती मंदिर नाट्यगृहाचा वापर नाट्य प्रयोग, सांस्कृतिक कार्यक्रम व लोकशिक्षण यासाठीच करता येईल. लोक शिक्षण व सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये कोणत्या कार्यक्रमाचा समावेश होतो , यासंबंधी मा.महानगरपालिका आयुक्त यांचा निर्णय अखेरचा व बंधनकारक राहील.

५) ठरवून दिलेल्या वेळेत प्रयोग संपविण्याची जबाबदारी अजर्दारावर राहील व दिलेल्या वेळात नाट्यगृह रिकामे करुन दिले पाहिजे , तसे न केल्यास कार्यक्रम बंद करण्याचा अधिकार व्यवस्थापक यांना राहील व ठरवून दिलेल्या वेळेपेक्षा अधिक वापरलेल्या प्रत्येक जादा तास किंवा त्याचे भागास रु.२५००/- + GST जादा आकार अर्जदारास द्यावा लागेल. न दिल्यास जादा रकमेची वसुली अनामत रकमेतून करणेत येईल. मात्र पुढील सत्रात कार्यक्रम असल्यास ज्यादा वेळ देता येणार नाही कार्यक्रम वेळे संपविण्याची जबाबदारी संयोजकाची राहील.

६) अर्जदाराने नाट्यगृह बुकिंग ऑनलाईन पध्दतीने करणे आवश्यक आहे. यासाठी अनामत व हॉल भाडे ऑनलाईन पध्दतीने भरणे गरजेचे आहे. हे बुकिंग केवळ हॉलचे असून प्रत्यक्ष कार्यक्रमाच्या वेळी वापरण्यात आलेल्या साहित्याचे अथवा इतर वापराचे भाडे स्वतंत्र भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन बुकिंग तारखेच्या तीन महिने आधी प्रत्येक तिमाहीस बुकींगची सुरुवात प्रत्येक तिमाही सुरु होण्याच्या तीन महिने अगोदरपासून सुरु करण्यात येईल.

७) मागणीदारास त्याचे काही अडचणीमुळे त्याने बुकींग केलेली तारीख रद्द करण्याचा प्रसंग आला तर भाडे रक्कम ही खालीलप्रमाणे परत मिळू शकेल.

प्रयोग दिनांकाचे २ महिने पूर्वी कळविल्यास ९०% भाडे रक्कम परत मिळेल.

प्रयोग दिनांकाचे १ महिने पूर्वी कळविल्यास ८०% भाडे रक्कम परत मिळेल.

प्रयोग दिनांकाचे ७ दिवस अगोदर कळविल्यास ५०% भाडे रक्कम परत मिळेल.

प्रयोग दिनांकाच्या 7 दिवस अथवा त्या पेक्षा कमी कालावधीत कार्यक्रम रद्द केल्यास भाडे रक्कम परत मिळणार नाही. केवळ अनामत रक्कम परत मिळेल.

८) एखाद्या संस्थेस तारीख दिल्यानंतर तारखांची आपसात अदलाबदल करता येणार नाही. तारखांची अदलाबदल करणेबाबतचा अर्ज मंजूर अगर नामंजूर करणेचा अधिकार मा.आयुक्त यांना राहील. याचे कारण देणेत येणार नाही.

९) एखाद्या अर्जदारास ठरलेल्या दिवशी ठरलेल्या कार्यक्रमासाठी काही कारणामुळे अगर अडचणीमुळे नाट्यगृहाचा वापर करता आला नाही तर त्याने भरलेल्या भाड्याची रक्कम त्यास परत केली जाणार नाही. मात्र शासकीय कारणामुळे दिलेली परवानगी रद्द करावी लागली तर त्यांना प्रयोगासाठी त्यानंतरची तारीख दिली जाईल. अगर त्यांनी तशी इच्छा व्यक्त केल्यास त्यांना भरलेली भाडयाची रक्कम त्यास परत केली जाईल.

१०) शनिवार , रविवार व सार्वजनिक सुट्टी या दिवशी प्रयोग असेल तर प्रती प्रयोगास रु. ५००/- जादा आकार पडेल.

११) सर्व लेबर लॉ , सरकारी नियम यांची जबाबदारी मागणीदारावर राहील.कार्यक्रम सादर करणेपूर्वी नाट्यगृह व्यस्थापकांना पुढील परवाने प्रयोगापूर्वी ८ दिवस अगोदर दाखविले पाहिजेत.

१)अपर जिल्हाधिकारी दंडाधिकारी ,सोलापूर यांची परवानगी

२)कार्यक्रमास करमणूक कर लागू असेल तर संबंधित कर अधिका-यांची लेखी परवानगी

३)तिकीट विक्री करण्यासाठी अपर जिल्हा दंडाधिकारी यांची परवानगी

४)अपर जिल्हा दंडाधिकारी यांचेकडून मिळालेला परफॉर्मन्स परवाना

५)अपर जिल्हा दंडाधिकारी यांचेकडील लाऊड स्पीकर विषयक परवाना

६) महानगरपालिकेच्या थिएटर टॅक्स भरल्याची पावती व जाहिरात बोर्ड लावणे संबंधीचा

परवाना असे योग्य ते परवाने नसल्यास प्रयोग करु दिला जाणार नाही.याबद्दलची सर्व कमी जास्त जबाबदारी प्रयोगाशी संबंधितांवर राहील.

१२) नाट्यगृह ताब्यात दिल्यापासून ते रिकामे परत देईपर्यंतच्या वेळेत त्याची खराबी अगर नुकसानी होणार नाही याची जबाबदारी अर्जदारावर राहील. जर इमारतीची अगर फर्निचर

फिटींग्ज ,पेन्टींग ,विजेची उपकरणे अगर इतर साधनसामुग्री याची काही खराबी अगर नुकसानी झाल्यास त्याबद्दल मा. महागनरपालिका आयुक्त अथवा त्यांचे वतीने व्यवस्थापक ठरवतील ती नुकसान भरपाई अर्जदारास भरुन द्यावी लागेल. ही वसुली अनामत रकमेतूनही करण्यात येईल.

१३) या नाट्यगृहात होणा-या प्रयोगामुळे इतर कोणाच्या हक्काचा भंग झाला असेल तर त्याची जबाबदारी अर्जदारावर राहील.

१४) नाट्यगृहाचा उपयोग करण्यासाठी अर्जदारास दिलेली परवानगी रंगमंच , रंगपट , प्रेक्षागृह व यांच्याशी संबंधित मार्ग व परिसर एवढ्या मर्यादीत राहील. इमारतीच्या इतर भागात प्रवेश मिळण्याचा अधिकार या परवानगीने अर्जदारास अगर कार्यक्रमाशी संबंधित असलेल्या अन्य कोणासही प्राप्त होत नाही.

१५) नाट्यगृहात सुसज्ज रंगमंच , रंगपट , ध्वनी व्यवस्था ,प्रकाश व्यवस्था व शीत व्यवस्था आहे. वीज गेल्यास त्याची पर्यायी व्यवस्था म्हणून जनरेटरची सोय केली आहे. नाट्यगृहातील ध्वनी यंत्रणा ही नाटक, व्याख्यान या साठी उपयुक्त असून इतर सर्व कार्यक्रमासाठी संयोजकांनी बाहेरी ध्वनी व्यवस्था वापरणे उपयुक्त ठरेल. या सर्व तरतुदी कार्यक्षम ठेवण्याचा प्रयत्न केला जाईल. परंतु काही अपरिहार्य कारणामुळे यांत बिघाड निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी महानगरपालिकेवर राहणार नाही.

१६) कार्यक्रमासाठी संयोजक, कलाकार, प्रेक्षक यांच्या कोणत्याही वस्तू हरविल्यास अथवा चोरीला गेल्यास त्याची जबाबदारी महापालिकेची असणार नाही.

१७) नाट्यगृहात थुंकणे , धूम्रपान करणे , घाण करणे बेशिस्त किंवा आक्षेपार्ह वर्तन करणे , नाट्यगृहातील वस्तूची खराबी करणे या गोष्टींना मनाई राहील व या उप्परही अशी नुकसानी केली तर त्याबद्दल भरपाई करण्याची जबाबदारी अर्जदारावर राहील. याबाबत मा.आयुक्त अथवा त्यांचे वतीने व्यवस्थापक ठरवतील तो दंड लागू राहील.

१८) नाट्यगृहातील कार्यक्रमाच्या वेळी रहदारीच्या नियंत्रणासाठी जरुरीप्रमाणे पोलिस मदतीची व्यवस्था अर्जदाराने केली पाहिजे. अशी व्यवस्था अर्जदाराने केलेली नसेल व कोणत्याही कारणास्तव पोलीस मदतीची जरुरी भासल्यास व्यवस्थापक पोलीस मदत मागवतील व त्याचा खर्च अर्जदारास द्यावा लागेल व त्याची वसुली अनामत रकमेतून करणेत येईल.

१९) उपलब्ध असल्यास प्रयोगाच्या नेहमीच्या वेळाव्यतिरिक्त इतर वेळी रंगीत तालमीसाठी नाट्यगृह मिळू शकेल. मात्र यावेळी एयर कंडीशन ची व्यवस्था असणार नाही. प्रत्येक तीन तासाच्या रंगीत तालमीसाठी रु.२५०० /- + GST आकार घेतला जाईल. ही रक्कम अर्जदारास ऑनलाईन भरावी लागेल. रंगीत तालमीच्या वेळी प्रेक्षागारात सदर संस्थेचे पदाधिकारी व संबंधित व्यक्ती शिवाय इतरांस प्रवेश दिला जाणार नाही . ही संख्या दोन्ही मिळून ३५ पेक्षा जास्त नसावी.

२०) नाट्यगृहाचे व्यवस्थापक हे मा. आयुक्त यांच्या नियंत्रणाखाली या नाट्यगृहाची व्यवस्था व दैनंदिन कारभार पाहतील.

२१) सदर नियम बदलणे अगर दुरुस्त करणे अगर जादा नियमांची भर घालणे यासाठी नोटीस न देता कारवाई करण्याचा अधिकार मा.आयुक्त यांना आहे. ते नाट्यगृह वापरणा-या एजन्सीजवर बंधनकारक राहतील.

२२) सदर नियमांच्या अर्थाबदल अगर नाट्यगृहाच्या उपयोगाबद्दल कोणत्याही बाबतीत अर्जदार व व्यवस्थापक यांच्यात मतभेद झाल्यास त्यासंबंधी मा. महापालिका आयुक्त यांचे आदेश अंतिम राहील व तो दोघांवरही बंधनकारक राहिल. कोणतेही कारण न देता नाट्यगृह नाकारणेचा अधिकार मा. आयुक्त यांना राहिल.

२३) <u>ऑनलाईन बुकींग पुढील ९० दिवसापर्यंत करता येईल.</u>

२४) <u>एकाच स्लॉट करिता दोन जणांचे ऑनलाईन बुकींग झाल्यास वेळेनुसार प्रथम बुकींग झालेल्याला प्राधान्य दिले जाईल.</u>

२५) <u>ऑनलाईन बुकींगचे पेमेंटची दुसरे दिवशी बँकेशी रुजवात घेऊन खात्री केलेनंतर बुकींग पक्के करणेत येईल अन्यथा बुकींग रद्द केले जाईल.</u>

२६) <u>संयोजकाने नाट्यगृहाची प्रत्यक्ष पाहणी करून बुकिंग करावे. उपलब्ध साहित्याची खातरजमा करून घ्यावी. ऐनवेळी इतर साहित्याची मागणी केल्यास मिळणार नाही.</u>

२७) <u>सदरचे नियम सोलापूर न्यायकक्षेच्या अधिन राहतील.</u>

२८) <u>बुकींग केलेल्या सत्राचे वेळेनुसार वेळेत कार्यक्रम संपविण्याची जबाबदारी संयोजकाची राहील.</u>

२९) <u>संयोजकाने सर्व अटी व शर्ती वाचूनच ऑनलाईन बुकिंग करावे.</u>

आयुक्त
सोलापूर महानगरपालिका सोलापूर